# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २३/०३/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा भागेमाहेरी येथे दिनांक २१/०३/२०२२ रात्रीचे २०.०० वा. ते २२/०३/२०२२ चे सकाळी ०९.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— प्रतीक रमेशराव तडस, वय ३० वर्ष, रा. सावनेर तह. सावनेर यांचे मौजा भागेमाहेरी अंतर्गत कोलार नदीला असलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यात पाणी अडविणे करिता लागलेल्या लोखंडी फळ्या १५ अंदाजे किमती २७,०००/— रु. मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ए.एस.आय रामराव पवार मो.नं ७८७५९८३३६० हे करीत आहे.

### फसवणुक

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ३ कि. मी अंतरावरील जे एन हॉस्पीटल कांद्री कन्हान येथे दिनांक ०८/०३/२०२२ ते दिनांक १०/०३/२०२२ चे १९.०० वा. ते १३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मयुर विपीनकुमार मल्लीक, वय ३० वर्ष रा. कांद्री वार्ड नं. १ कन्हान याने ऑनलाईन ओला ईलेक्ट्रॉनिक मोबीलीटी प्राईव्हेट लि. मध्ये मोपेड गाडी बुक केली होती. तेव्हा अज्ञात दोन आरोपीतांनी फिर्यादींना फोन करून बुकींग करिता आधारकार्ड, पॅनकार्ड व फोटो वॉटस अप वर पाठवीण्यास सांगीतले. त्यानंतर ४९९/—रू. भरा असे फिर्यादींना सांगुन वेळो—वेळी फिर्यादी यांनी त्याच्या खात्यामधुन आरोपीतांच्या वेग—वेगळया तीन खात्यावर एकुण १,३०,०००/—रू. असे आरटीजीएस व गुगल पे द्वारे पाठविले. परंतु फिर्यादीला मोपेड गाडी मिळाली नाही. आरोपीनी फिर्यादी सोबत धोखाधळी केली त्यानंतर सुध्दा ट्रान्सपोर्ट चार्ज ची मांगनी केली तेव्हा फिर्यादीचे लक्षात आले कि, 'माझ्या सोबत धोखाधळी होत आहे'.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ३४ भादंवि. ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मोहन शेळके पो.स्टे कन्हान. मो.क्र. ९०४९१३६९१९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर